तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १६ जुलै २०२४

आतील पानावर
पान २ – रणवीर सिंगच्या हाती मोठा प्रोजेक्ट
पान ३ – 'गनमास्टर जी ९' चा टीझर रिलीज
पान ४ – समंथा पुन्हा थाटणार संसार
पान ५ – प्रिया बापट–उमेश कामत सिनेमात एकत्र...
पान ६ – 'धडक २'चे नवीन पोस्टर रिलीज

# क्रिश ४ मध्ये हृतिक तिहेरी भूमिकेत



वॉर २ नंतर आता अभिनेता हृतिक रोशनच्या क्रिश ४ या चित्रपटाची जोरदार चर्चा आहे. लवकरच या चित्रपटाच्या शुटिंगला सुरुवात होणार असून, चित्रपटाबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. या चित्रपटात अभिनेता हृतिक रोशन एक नव्हे तर तीन भूमिकेत दिसणार आहे. याच वर्षी क्रिश ४ ची घोषणा करण्यात आली होती. तर या चित्रपटाचे दिग्दर्शन राकेश रोशन करणार नसल्याची बातमी देखील समोर आली होती. या चित्रपटाची घोषणा झाल्यानंतर चित्रपटाची कथा आदी महत्वाच्या गोष्टींवर चर्चा सुरू झाल्या आहेत. पुढच्या महिन्यात हृतिकचा बहुचर्चित वॉर २ हा चित्रपट रिलीज होणार असल्याने हृतिक या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर तो लगेचच क्रिश ४ तयारीला सुरूवात करणार असल्याची माहिती आहे. मात्र, या चित्रपटात नवीन स्टारकास्ट दिसणार की जुनी, याबद्दल सस्पेन्स कायम आहे. 'क्रिश ४' या चित्रपटात हृतिक रोशन एक-दोन नव्हे, तर तीन भूमिकांमध्ये दिसणार आहे. हृतिकने क्रिश ३ दुहेरी भूमिका साकारलेली होती. कोई मिल गया हा आतापर्यंतच्या बॉलीवूडमधील सर्वात गाजलेला चित्रपट आहे. हा चित्रपट साय-फाय चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटात हृतिकचा अभिनय जितका प्रेक्षकांना आवडला होता. तितकाच या चित्रपटातील जादू या एलियन पात्राने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले होते. डीएनएच्या वृत्तानुसार, जादू क्रिश ४ मध्ये दिसणार असल्याचे सांगण्यात आले आहे.



# 'बॅटल ऑफ गलवान'मध्ये सलमानचा जबरदस्त अवतार

बॉलीवूडचा दबंग अर्थात सलमान खान 'बॅटल ऑफ गलवान' या त्याच्या आगामी चित्रपटासाठी सज्ज झाला आहे. अलीकडेच या चित्रपटाचे पोस्टर समोर आले आहे. या पोस्टरमध्ये सलमानचा लुक खूपच दमदार आणि हिंसक दिसत आहे. सध्या त्याचा हा पोस्टर लुक सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. सलमान खानने त्याच्या 'बॅटल ऑफ गलवान' चित्रपटातील लुकची पहिली झलक चाहत्यांसोबत शेअर केली आहे. सलमानचा यापूर्वीचा 'सिकंदर' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर काही खास कमाल करू शकला नव्हता.

सलमान खानसोबत या चित्रपटात अभिनेत्री चित्रांगदा सिंह देखील दिसणार आहे. 'बॅटल ऑफ गलवान' ही कहाणी जून २०२० रोजी भारत आणि चीनच्या सैनिकांमध्ये गलवान खोऱ्यात संघर्ष झाला त्यावर आधारित आहे. हे युद्ध पारंपरिक शस्त्रांऐवजी दगड, लाकडी काठ्या यांनी लढले गेले. कारण त्या भागात बंदुका वापरण्यावर बंदी होती. या संघर्षात भारताचे काही जवान शहीद झाले होते, ज्यात कर्नल संतोष बाबू यांचाही समावेश होता. सलमान खानच्या 'सिकंदर' चित्रपटाच्या अपयशानंतर आता सगळ्यांच्या नजरा 'बॅटल ऑफ गलवान' या चित्रपटावर खिळल्या आहेत.



# रणवीर सिंगच्या हाती मोठा प्रोजेक्ट



बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंग सध्या त्याच्या आगामी 'धुरंधर' चित्रपटामुळे चर्चेत आहे. रणवीर सिंगच्या या चित्रपटाशी संबंधित अपडेट्स समोर येत आहेत. अलिकडेच या चित्रपटातील रणवीर सिंगचा एक लूकही लीक झाला होता, ज्याला खूप पसंती मिळाली होती. या सगळ्यानंतर आता रणवीर सिंगचे नाव एका नवीन प्रोजेक्टशी जोडले जात आहे, जे नुकत्याच एका मीडिया रिपोर्टमध्ये समोर आले आहे. अलिकडेच रणवीर मेहबूब स्टुडिओमध्ये शूटिंग करताना पाहायला मिळाला. त्यामुळे तो पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. रणवीर सिंगचे नाव एका नवीन प्रोजेक्टशी जोडले जात आहे, ज्याबद्दल एक मोठी बातमी देखील समोर आली आहे. बॉलिवूड हंगामाच्या रिपोर्ट्सनुसार, रणवीर सिंग सध्या मुंबईतील मेहबूब स्टुडिओमध्ये एका मोठ्या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. ही बातमी समोर आल्यानंतर रणवीर सिंगचे चाहते खूप आनंदी दिसत आहेत. आतापर्यंत रणवीर सिंगच्या या नवीन चित्रपटाशी संबंधित कोणतीही अधिकृत बातमी समोर आलेली नाही. रणवीर सिंग त्याच्या आगामी बिग बजेट चित्रपटासोबतच इतर अनेक चित्रपटांमुळे चर्चेत आहे. रणवीर सिंगच्या आगामी चित्रपटांच्या यादीत 'धुरंधर' आणि 'डॉन ३' यांचा समावेश आहे.



# इमरान आणि हिमेश १८ वर्षांनी एकत्र

हिमेश रेशमिया आणि इमरान हाश्मी यांच्या जोडीने बॉलिवूडला अनेक उत्तम गाणी आणि थ्रिलर चित्रपट दिले आहेत. आता ही जोडी 'गनमास्टर जी९' मध्ये पुन्हा एकदा एकत्र काम करण्यास सज्ज झाली आहे. चित्रपटाच्या निर्मात्यांनी त्याचा टीझर रिलीज केला आहे. चित्रपट निर्माते दीपक मुकुट यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये दुधाने भरलेल्या बादलीतून एक गूढ हात बाहेर येताना दिसतो. या दरम्यान, इमरान म्हणतो. 'जर तुम्ही माझ्याशी गोंधळ केलात तर काही हरकत नाही. जर तुम्ही चुकून तुमच्या कुटुंबाला हात लावलात तर लक्षात ठेवा. मी व्यवसायाने दूधवाला आहे, मी गुंडावाला आहे. या व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये लिहिले आहे 'दुधापासून गुंडा, सब्जीपासून गुंडा, गोळीपासून मारहाण, गनमास्टर जी ९ विनाशासाठी तयार आहे. टीम घातक आहे. दीपक मुकुट, नर मुकुट, सोहम रॉकस्टार एंटरटेनमेंट इमरान हाश्मी, आदित्य दत्त आणि हिमेश रेशमिया यांना परत आणण्यास आनंदी आहेत. त्यांच्यासोबत जेनेलिया देशमुख आणि अपारशक्ती खुराणा आहेत. गनमास्टर जी९ २०२६ मध्ये थिएटरमध्ये येणार आहे.' या पोस्टवर अनेक वापरकर्त्यांनी कमेंट केली आहे. एका वापरकर्त्याने लिहिले आहे की 'अखेर हिमेश रेशमिया आणि इमरान हाश्मी एकत्र आले आहेत. २००० चा काळ पुन्हा परत येईल.' दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले आहे की 'अरे देवा, २०२५ मध्ये इमरान हाश्मी आणि हिमेश रेशमिया. वाह काय वर्ष होते.' दुसर्‍या वापरकर्त्याने लिहिले आहे की 'इमरान हाश्मी आणि हिमेश रेशमिया खूप दिवसांनी. जुने आणि सोनेरी दिवस परत येत आहेत.' हिमेश रेशमियाने इमरान हाश्मीच्या 'आशिक बनाया आपने' आणि 'अक्सर' या चित्रपटांमध्ये काम केले आहे. हिमेशने इमरान हाश्मीच्या अनेक गाण्यांना आवाज दिला आहे जे हिट झाले आहेत. यामध्ये 'झलक दिखला जा', 'आशिक बनाया आपने' आणि 'आपकी कशिश' सारखी गाणी समाविष्ट आहेत. २०१९ मध्ये प्रदर्शित झालेल्या इमरानच्या 'द बॉडी' या चित्रपटात हिमेशचे एक गाणे होते. २००७ मध्ये त्याने इमरानच्या 'गुड बॉय बॅड बॉय' या चित्रपटात संगीत दिग्दर्शक म्हणून काम केले. आता तो १८ वर्षांनंतर इमरान हाश्मीच्या कोणत्याही चित्रपटाला संगीत देईल असे म्हणता येईल. 'गनमास्टर जी९' मध्ये इमरान हाश्मी, अपारशक्ती खुराणा आणि जेनेलिया देशमुख महत्त्वाच्या भूमिकांमध्ये असतील. त्याचे निर्माते दीपक मुकुट, हुनर मुकुट आहेत. हा चित्रपट सोहम रॉकस्टार एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली प्रदर्शित होणार आहे.



# ‘कन्नप्पा’ सिनेमात अक्षयची ‘ही’ चोरी पकडली

अभिनेता अक्षय कुमार हा बॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेता. अक्षयला आपण विविध सिनेमात अभिनय करताना पाहिलंय. अक्षय सध्या त्यांच्या आगामी चित्रपटातील एका दृश्यामुळे सोशल मीडियावर चर्चेत आले आहेत. ‘कन्नप्पा’ या तेलुगू पौराणिक चित्रपटात भगवान शंकराची भूमिका साकारताना, एका व्हिडिओमध्ये अक्षय टेलिप्रॉम्प्टरवरून संवाद वाचत आहे, असा आरोप नेटकऱ्यांनी केला आहे. हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे.

या व्हिडिओमध्ये अक्षय कुमार एका सीनमध्ये संवाद बोलताना दिसतोय. मात्र, त्यावेळी अक्षयच्या डोळ्यांची हालचाल, संवाद बोलताना चेहऱ्यावर दिसणारा ताण, आणि काही क्षण डावीकडे बघण्याची हालचाल, यावरून नेटकऱ्यांनी अंदाज बांधला की, तो स्क्रिप्ट टेलिप्रॉम्प्टरवरून वाचत होते. काहींनी हा व्हिडीओ झूम करुन अक्षयच्या पापण्यांमध्ये टेलिप्रॉम्प्टरचं प्रतिबिंब दिसतंय, असाही आरोप केलाय. ही गोष्ट लक्षात येताच, अनेकांनी अक्षय कुमारवर टीका केली. काहींनी त्यांना 'टेलिप्रॉम्प्टर कुमार' असे म्हणत ट्रोल केलं, तर काहींनी त्याच्या अभिनयावर आणि तयारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. एवढा मोठा कलाकार असूनही संवाद पाठ न करता वाचावं लागतं, हे निराशाजनक आहे, अशा शब्दात अनेकांनी अक्षयला नावं ठेवली. दरम्यान, काही चाहत्यांनी अक्षय कुमारची बाजू घेत त्याला पाठिंबा दिला. अक्षय कुमार वर्षभरात अनेक चित्रपट करतो, त्यामुळे काही वेळा अशा तांत्रिक साधनांचा वापर करणे गरजेचे ठरते, असा युक्तिवाद त्यांनी केला. यापूर्वीही 'सरफिरा' चित्रपटाच्या प्रचारादरम्यान अक्षय कुमार टेलिप्रॉम्प्टर वापरत असल्याची चर्चा झाली होती. मात्र, त्यावर अक्षयने कोणतेही स्पष्ट स्पष्टीकरण दिले नव्हते.

‘कन्नप्पा’ हा एक भव्य पौराणिक चित्रपट असून, त्यात अक्षय कुमार भगवान शंकराच्या भूमिकेत झळकत आहे. पण त्याचा हा व्हिडिओ पाहून, आता सोशल मीडियावर अक्षयला टीकेचा सामना करावा लागत आहे. या प्रकरणावर अक्षय कोणतं स्पष्टीकरण देणार, याची सर्वांना उत्सुकता आहे.

# इंडस्ट्रीत नवीन असताना खूप एकटेपणा जाणवतो



बॉलीवूडमध्ये असे अनेक कलाकार आहेत, ज्यांच्याकडे अभिनयाचा कोणताही वारसा नसताना त्यांनी स्वकर्तृत्वावर इंडस्ट्रीत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. पण, यादरम्यान कलाकारांना नवीन असल्याने काही वेळा अडचणींना सामोरं जावं लागतं. असंच काहीसं एका प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्रीबरोबर झाल्याचं तिने सांगितलं आहे. ‘स्टुडंट ऑफ द इयर २’मधून बॉलीवूडमध्ये पदार्पण करणारी अभिनेत्री तारा सुतारियाने इंडस्ट्रीत नवीन असताना तिला खूप एकटेपण जाणवायचं, तसेच इंडस्ट्रीतील कामाच्या पद्धतींची सवय व्हायला तिला वेळ लागला याबाबत सांगितलं आहे. ताराने नुकतीच एक मुलाखत दिली. यामध्ये अभिनेत्री म्हणाली, जेव्हा मी माझ्या करिअरची सुरुवात केली होती, तेव्हा मला इंडस्ट्रीतील लोकांबद्दल फार काही माहिती नव्हती. त्यामुळे बऱ्याच गोष्टी माझ्यासाठी नवीन होत्या. तारा पुढे म्हणाली, चित्रपटसृष्टीत मी नवीन असल्याने काही गोष्टी समजून घेण्यासाठी व त्यांची सवय होण्यासाठी खूप वर्षे जावी लागली. मी या इंडस्ट्रीतील नसल्याने हा प्रवास माझ्यासाठी खूप कठीण आणि एकटेपण जाणवणारा होता, कारण मी कोणाशी चर्चा करू शकेन किंवा कोणाकडून सल्ला घेता येईल असं कोणीच माझ्या ओळखीत नव्हतं. तारा पुढे याबाबत असंही म्हणाली की, जे याच क्षेत्रातले असतात किंवा ज्यांच्या घरातील कोणी या क्षेत्रातील असेल तर त्यांना इंडस्ट्रीतील बाऱ्याच गोष्टींबद्दल माहिती असते. करिअरमध्ये असे खूप प्रसंग आले, जिथे मला कोणाच्यातरी मार्गदर्शनाची गरज होती. जर माझ्याकडे अशी कोणी व्यक्ती असली असती तर मला खूप मदत झाली असती.

दरम्यान, ताराच्या कामाबद्दल बोलायचं झालं, तर तिने ‘स्टुडंट ऑफ द इयर २’ चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. यासह तिने ‘मरजावान’, ‘एक व्हिलन रिटर्न्स’, ‘अपूर्वा’ यांसारख्या चित्रपटांत आणि वेब सीरिजमध्ये काम केलं आहे.



# ‘गनमास्टर G९’ चा टीझर रिलीज

बॉलिवूड अभिनेता इमरान हाश्मी एका नव्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. ‘गनमास्टर जी९’ असे या चित्रपटाचे नाव आहे. विशेष म्हणजे या चित्रपटात अभिनेत्री जेनिलीया देशमुख देखील झळकणार आहे. यांच्यासोबत चित्रपटात अपारशक्ती खुराना देखील दिसणार आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर समोर आला आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन आदित्य दत्त यांनी केले आहे. चित्रपटाचा निर्माता दिपक मुकुट यांनी इन्स्टाग्राम अकाउंटवर धमाकेदार टीझर शेअर केला आहे. सोबतच दूध से बारूद, सब्जी से गुंडा, गोलियों से मारना है, गनमास्टर जी ९ तबाही के लिए तैयार हो रहा है, और टीम तैयार, लोडेड और घातक है!, असे या टीझरला हटके कॅप्शन दिले आहे. ‘गनमास्टर जी९’ चित्रपटाचा टीझर तीन भागांमध्ये रिलीज करण्यात आला आहे. पहिल्या भागात तो हातात बंदूक घेऊन दुधाने भरलेल्या बादली मधून त्याचा हात बाहेर काढताना दिसत आहे. त्याच्या हातात रूद्राक्षाची माळ, हातावर शिवलिंग आणि नंदीबैलाचा टॅटू दिसत आहे. टीझरच्या दुसर्या भागामध्ये जेनिलीया देशमुख बांगड्यांनी भरलेल्या हातात सूरा घेऊन दुधाच्या बादलीमधून हात बाहेर काढत म्हणते की, घर की बहू हूं, इसका ये मतलब नहीं कि सिर्फ निर्मल और शीतल हूं घर पर सब्जी आएगी तो सब्जी काटुंगी लेकिन अगर घर पर गुंडे-बदमाश आए तो, सब्जी थोड़ी काटूंगी. टीझरच्या तिसर्या भागामध्ये अपारशक्ती खुरानाचा हात पाहायला मिळत आहे. तो म्हणतो की, लोहे की कांटी, दे सुराठी. हाथ में है बम. गुड़गांव में लोग हमसे ७० फीट दूर रहते हैं क्योंकि बम और हम कभी भी फट सकते हैं. असं म्हणत हातात बॉम्ब घेऊन दुधाने भरलेल्या बादली मधून त्याचा हात बाहेर येताना दिसत आहे. ‘गनमास्टर जी ९’ चित्रपट २०२६ ला रिलीज होणार आहे.



# आयसीयुतील रूग्णाला प्रभासने दिला मदतीचा हात

आजकाल दाक्षिणात्य सुपरस्टार प्रभास हा त्याच्या व्यवसायिक आणि वैयक्तिक आयुष्यामुळे कायम चर्चेत असतो. प्रसिद्धीच्या शिखरावर असतानाही या अभिनेत्याने त्याच्या साधेपणाने चाहत्यांची मनं जिंकली आहेत. अशातच प्रभासने केलेल्या एका कृतीचं सर्वत्र कौतुक होतंय. सध्या टॉलिवूडचे प्रसिद्ध अभिनेते फिश वेंकट हे एका गंभीर आजाराशी झुंज देत आहेत. किडनी निकामी झाल्याने त्यांना बऱ्याच समस्यांना सामोरं जावं लागत आहे. त्यासाठी त्यांना डॉक्टरांनी किडनी ट्रान्सप्लांटचा सल्ला दिला आहे. अशा परिस्थितीत फिश वेंकट यांच्या कुटुंबीयांना आर्थिक संकटांचाही सामना करावा लागत आहे. अशा कठीण वेळी, सुपरस्टार त्यांचा कुटुंबीयांसाठी देवदूत बनून प्रभास धावून आला आहे. अभिनेते फिश वेंकट यांची मुलगी श्रावंतीने माध्यमांशी बोलताना याबाबत माहिती सांगितली. या कठीण प्रसंगी सुपरस्टार प्रभास त्यांच्या मदतीसाठी धावून आला आणि ५० लाख रुपयांची मदत केली. त्याच्या या कृतीचं सर्व स्तरातून कौतुक होत आहे. त्याविषयी बोलताना श्रावंती म्हणाली, माझ्या वडिलांची प्रकृती गंभीर आहे. सध्या ते आयसीयूमध्ये आहेत आणि त्यांना किडनी ट्रान्सप्लांची आवश्यकता आहे. त्यासाठी जवळपास ५० लाख रुपये इतका खर्च आहे. प्रभासच्या असिस्टंटने आम्हाला फोन केला आणि आर्थिक मदत करण्याचं आश्वासन दिलं आहे. त्यानंतर तिने सांगितलं, प्रभासच्या मदतीने काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे, परंतु आमच्यासमोर सर्वात मोठं आव्हान म्हणजे किडनी डोनर शोधण्याचं आहे. काही कारणास्तव कुटुंबातील कोणालाही त्यांना किडनी डोनेट करू शकत नाही. त्यामुळे, किडनी डोनरचा शोध अद्यापही सुरू आहे. असं तिने सांगितलं. फिश वेंकट हे तेलुगू चित्रपटसृष्टीतील एक मोठं नाव आहे. त्यांनी आजवरच्या कारकिर्दीत 'बनी', 'अधर्स', 'गब्बर सिंग' आणि 'धी' सारख्या अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केलं आहे. तसेच ते आपल्या खास विनोदीशैलीसाठी सुद्धा ओळखले जातात.

# 'कांतारा: चॅप्टर १' मध्ये ऋषभ शेट्टीचा खतरनाक लुक

दाक्षिणात्य अभिनेता ऋषभ शेट्टीच्या 'कांतारा: चॅप्टर १' चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. वाढदिवसानिमित्त त्याने चाहत्यांना सरप्राइज दिले आहे. बहुप्रतिक्षित 'कांतारा: चॅप्टर १'चा जबरदस्त पोस्टर रिलीज करण्यात आले आहे. 'कांतारा: चॅप्टर १' च्या पोस्टरमध्ये ऋषभ शेट्टीचा रूद्र अवतार पाहायला मिळत आहे. यामध्ये हातात शस्त्र घेऊन ऋषभ खूपच आक्रमक दिसत आहेत.निर्मात्यांनी आपल्या अधिकृत सोशल मिडिया हँडलवरून 'कांतारा: चॅप्टर १'चे नवीन पोस्टर शेअर करून त्याला हटके कॅप्शन दिलं आहे.

चित्रपटाच्या पोस्टरमध्ये एक अत्यंत भव्य युद्ध दृश्य पाहायला मिळत आहे. कन्नड आणि हिंदी व्यतिरिक्त हा चित्रपट चाहते इंग्रजी, तमिळ, तेलुगूसह एकूण सात भाषांमध्ये पाहू शकतील. निर्मात्यांनी सात वेगवेगळ्या भाषांमधील पोस्टरही शेअर केले आहेत. २०२२ साली प्रदर्शित झालेल्या 'कांतारा' चित्रपटाला मोठे यश मिळाले होते. या चित्रपटाने केवळ प्रेक्षकांची मने जिंकली नाही, तर भारतीय संस्कृती आणि लोक कथांना जागतिक व्यासपीठावर सादर केले. त्यामुळे चाहते आता 'कांतारा: चॅप्टर १'ची आतुरतेने वाट पाहत



आहेत. कांताराबद्दल बोलायचं झालं तर, हा चित्रपट ३० सप्टेंबर २०२२ रोजी प्रदर्शित झाला होता. याचं दिग्दर्शनही ऋषभनेच केलं होतं. १६ कोटींच्या बजेटमध्ये बनलेल्या या चित्रपटाने भारतात ३०९ कोटी रुपये कमावले होते. तर जागतिक स्तरावर या चित्रपटाने ४०० कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली होती.

यानंतर आता 'कांतारा: चॅप्टर १' चित्रपट २ ऑक्टोबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# समंथा पुन्हा थाटणार संसार



साउथ स्टार समांथा रूथ प्रभू तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे नेहमीच चर्चेत असते. नागा चैतन्यशी घटस्फोट घेतल्यानंतर, सर्वजण समांथाच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलत असतात. समांथा सध्या तिच्या प्रेम जीवनामुळे चर्चेत आहे. वृत्तांनुसार, ती दिग्दर्शक राज निदिमोरूला डेट करत आहे. दोघेही अनेक वेळा एकत्र दिसले आहेत परंतु दोघांनीही डेटिंगच्या बातम्यांवर मौन बाळगले आहे. समांथा अनेकदा सोशल मीडियावर असे फोटो शेअर करते ज्यामध्ये ती राज निदिमोरूसोबत दिसते. वृत्तांनुसार, दोघांमधील नाते अधिकच घट्ट झाले आहे आणि या वर्षाच्या अखेरीस ते त्यांचे नाते अधिकृत करू शकतात. कालांतराने दोघांमधील नाते अधिकच घट्ट झाले आहे. दोघेही या वर्षाच्या अखेरीस त्यांचे नाते अधिकृत करण्याचा विचार करत आहेत. दोघेही एकमेकांशी खूप वचनबद्ध आहेत. चाहत्यांना आशा आहे की समांथा तिच्या आयुष्यात पुढे जाईल आणि पुन्हा लग्न करू शकेल. तथापि, लग्नाबद्दल अद्याप कोणतीही बातमी समोर आलेली नाही. काही काळापूर्वी, समांथा राज निदिमोरूसोबत लिव्ह इन करण्याचा विचार करत असल्याचे वृत्त आले होते. परंतु नंतर त्याच्या टीमने या वृत्तांना चुकीचे म्हटले. त्यांनी हे वृत्त चुकीचे असल्याचे स्पष्ट केले होते. राज निदिमोरू यांनी २०१५ मध्ये श्यामली डेशी लग्न केले होते. २०२२ मध्ये दोघेही वेगळे झाले. परंतु आतापर्यंत त्यांच्या घटस्फोटाची कोणतीही माहिती नाही. दुसरीकडे, सामंथाबद्दल बोलायचे झाले तर, तिने २०१७ मध्ये नागा चैतन्यशी लग्न केले. हे लग्न फार काळ टिकले नाही आणि २०२१ मध्ये दोघांचा घटस्फोट झाला.




# ललित प्रभाकरसोबत झळकणार 'ही' अभिनेत्री

सतीश राजवाडे दिग्दर्शित 'प्रेमाची गोष्ट २' सिनेमा लवकरच येत आहे. नुकताच सिनेमाचा फर्स्ट लूक आणि टीझर समोर आला. ललित प्रभाकर यामध्ये मुख्य भूमिकेत आहे. टीझरमध्ये स्वप्नील जोशी आणि भाऊ कदमही दिसले. ललितसोबत ऋचा वैद्य झळकणार आहे. याशिवाय सिनेमात हिंदी अभिनेत्रीही मुख्य भूमिकेत आहे. कोण आहे ही अभिनेत्री? सतीश राजवाडेंचा २०१३ साली 'प्रेमाची गोष्ट' हा मराठी सिनेमा खूप गाजला होता.

अतुल कुलकर्णी, सागरिका घाटगे आणि सुरेखा तळवलकर यांची सिनेमात मुख्य भूमिका होती. आता सतीश राजवाडेंनी 'प्रेमाची गोष्ट २'ची घोषणा केली आहे. ललित प्रभाकर, स्वप्नील जोशी, भाऊ कदम, ऋचा वैद्य आणि रिद्धीमा पंडित यांची सिनेमात मुख्य भूमिका आहे. रिद्धीमा पंडित ही हिंदी मालिकांमधून घराघरात पोहोचली. याशिवाय ती 'बिग बॉस ओटीटी' आणि 'खतरों के खिलाडी'मध्येही झळकली. रिद्धीमा मधल्या काळात भारतीय क्रिकेट संघातील युवा क्रिकेटपटू शुभमन गिलला ती डेट करत असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. मात्र नंतर रिद्धीमाने या सर्व चर्चा अफवा असल्याचं स्पष्टीकरण दिलं होतं. 'प्रेमाची गोष्ट २' हा प्रेम आणि नशीबाचा जादुई प्रवास दाखवणारा फँटसी सिनेमा असणार आहे. संजय छाब्रिया यांनी सिनेमाची निर्मिती केली आहे. २२ ऑक्टोबरला सिनेमा प्रदर्शित होणार आहे.

# ग्रुपिझम आहे आणि असणारच



बॉलीवूडमधील गटबाजी (ग्रुपिझम) बद्दल आपण अनेक चर्चा ऐकून आहोत. अलीकडे मराठी इंडस्ट्रीतही हे ग्रुपिझम होत असल्याचं पाहायला मिळतं. या गटबाजीबद्दल अनेकांनी त्यांची मतं व्यक्त केली आहेत. काहींनी गटबाजी असल्याचे उघडपणे सांगितलं आहे, तर काही याबद्दल अडून अडून बोलताना दिसतात. अशातच मराठी अभिनेते विद्याधर जोशी यांनीसुद्धा मराठीमधील गटबाजीबद्दल त्यांची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. मराठी नाटक, मालिका तसेच चित्रपट अशा तिन्ही माध्यमांतून प्रेक्षकांचे मनोरंजन करणारे अभिनेते म्हणजे विद्याधर जोशी. विनोदी, गंभीर तसेच नकारात्मक भूमिकांद्वारे त्यांनी मराठीसह हिंदी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केलं आहे. याशिवाय त्यांनी अनेक रिॲलिटी शोद्वारेही प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. विद्याधर जोशी अनेकदा त्यांची मत उघपडणे व्यक्त करताना दिसतात. अशातच त्यांनी साधलेल्या संवादात या इंडस्ट्रीतील गटबाजीबद्दल त्यांचं मत व्यक्त केलं. याबद्दल ते म्हणाले, ग्रुपिझम आहे. पण मला वाटतं थोड्या फार प्रमाणात ते असणारच. म्हणजे आता मला एखाद्याबरोबर काम करताना सहजपणा आणि आपलेपणा वाटत असेल; तर पुढे काम करताना समोरचा माणूस एखाद्या भूमिकेसाठी आपला विचार करतो. त्यामुळे थोडाफार ग्रुपिझम होतो आणि होत राहणार. यानंतर ते म्हणतात, पण मी याचा कधीच विचार केला नाही. एखादा मला त्याच्या ग्रुपमध्ये नाही घेत तर मी काय करू? मी त्याच्यावर रागावू शकत नाही. मी ज्या ग्रुपमध्ये आहे किंवा जिथे मी काम करत आहे, ते काम मी शंभर टक्के करत राहीन. कधीतरी समोरच्याची अडचण येईल, की एखादा माणूस कमी असेल आणि तेव्हा तो माझा विचार करू ही शकतो. त्यामुळे माझं आधीचं काम चांगलं असणं गरजेचं आहे. यानंतर त्यांनी सांगितलं, ग्रुपमध्ये जाऊन किंवा एखाद्याबरोबर दारू पिऊन आणि टाइमपास करून मला काम मिळेल असं नाही किंवा कार्यक्रमांना आणि पार्ट्यांना जाऊन काम मिळतं, यावरही माझा विश्वास नाही. त्यामुळे आधीच्या कामावरुनच दुसऱ्यांच्या ग्रुपमधला माणूस कामासाठी विचार करू शकतो. त्यामुळे ग्रुपिझम असलं तरी काय फरक पडत नाही. आपण आपलं काम करत राहायचं. दरम्यान, आजारामुळे काही काळ रंगभूमीपासून दूर गेलेले विद्याधर जोशी आता पुन्हा एकदा नाटकाद्वारे प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज झाले आहेत. पु.ल. देशपांडे यांच्या 'सुंदर मी होणार' नाटकाच्या नव्या सादरीकरणातून त्यांनी रंगभूमीवर पुनरागमन केलं आहे.

# प्रिया बापट-उमेश कामत सिनेमात एकत्र झळकणार!

मराठी मनोरंजनसृष्टीतील 'आदर्श' जोडी म्हणून प्रिया बापट व उमेश कामत यांच्याकडे पाहिलं जातं. हे 'क्युट कपल' तब्बल १२ वर्षांनंतर पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर एकत्र झळकणार आहे. यापूर्वी त्यांनी २०१३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'टाइमप्लीज' चित्रपटात एकत्र काम केलं होतं. गेल्या काही वर्षांपासून दोघांचे चाहते त्यांना मोठ्या पडद्यावर एकत्र पाहण्यासाठी उत्सुक होते आणि अखेर १२ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटातून प्रेक्षकांना उमेश-प्रियाला एकत्र पाहण्याची संधी मिळणार आहे. नुकतंच या चित्रपटाचं पहिलं पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आलं आहे. प्रिया बापट आणि उमेश कामत 'बिन लग्नाची गोष्ट' या सिनेमात एकत्र झळकणार आहेत. चित्रपटाच्या पोस्टरमध्ये प्रिया हाताची घडी घालून, मिश्कील चेहऱ्याने उभी आहे. निर्णयावर ठाम असल्याचा आत्मविश्वास तिच्या चेहऱ्यावर झळकत आहे. तर, उमेश हातात हार घेऊन, डोक्याला मुंडावळ्या बांधून उभा आहे. जणू काही तो लग्नासाठी तयार आहे परंतु, परिस्थिती काहीतरी वेगळी आहे. या सगळ्यांतून स्पष्ट होतं की, ही गोष्ट पारंपरिक विवाहसंस्थेच्या बाहेर जाऊन नात्यांची नवी मांडणी करणारी आहे.

दिग्दर्शक आदित्य इंगळे म्हणतात, ही गोष्ट आहे प्रेमाची, नात्यांमधल्या समज-गैरसमजांची, मनात धरून ठेवलेल्या गाठी सुटण्याची. हा चित्रपट येत्या १२ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे.



# ‘रामायण’ चित्रपटातून बॉबी देओल बाहेर?

बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूरच्या ‘रामायण’ चित्रपटाची पहिली झलक समोर आली. यानंतर चाहत्यांमध्ये चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. या चित्रपटाच्या कलाकारांबाबत रोज नवीन खुलासे होत आहेत. यातच आता ‘रामायण’ चित्रपटात बॉबी देओल कुंभकर्णाची भूमिका साकारणार आहे की नाही? असा सवाल उपस्थित केला जात



त्याबाबतचे सत्य समोर आले आहे. बॉबी देओल ‘रामायण’ चित्रपटाचा भाग नसणार आहे. बॉबी देओल या चित्रपटात कोणतीही भूमिका साकारत नाही. ही बातमी ऐकून अभिनेत्याचे चाहते खूप निराश झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून बॉबी चित्रपटात कुंभकर्णाची भूमिका साकारणार असल्याचे वृत्त समोर येत होते. याबाब तएका सूत्राने स्पष्ट केले आहे की, बॉबी देओलचे नाव या प्रोजेक्टसोबत अजिबात जोडलेले नाही. कलाकारांबद्दल लोक विविध अंदाज लावत आहेत. परंतु सत्य हे आहे की या पात्रासाठी अद्याप कोणतीही निश्चित एन्ट्री झालेली नाही.

बॉबी देओल सध्या ‘हरि हर वीरा मल्लू: पार्ट १’ या चित्रपटामुळे चर्चेत आहेत. या चित्रपटात त्याच्यासोबत साउथ स्टार पवन कल्याण, निधि अग्रवाल, नर्गिस फाखरी, नोरा फतेही आणि सत्यराज यांसारखे दिग्गज कलाकार दिसणार आहेत. हा चित्रपट २४ जुलै रोजी प्रदर्शित झाला आहे. याशिवाय तो आलिया भट्टसोबत ‘अल्फा’ हा चित्रपटातही दिसणार आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित ‘रामायण’ चित्रपटात रणबीर कपूर श्रीराम, यश रावण आणि साई पल्लवी माता सीतेच्या भूमिकेत दिसणार आहेत.

याशिवाय लक्ष्मणाची भूमिका रवि दुबे आणि हनुमानाची भूमिका बॉलिवूडचा दमदार अभिनेता सनी देओल साकारणार आहे. हा चित्रपट २०२६ मध्ये दिवाळीला प्रदर्शित होणार आहे. तर दुसरा भाग २०२७ च्या दिवाळीला प्रदर्शित होईल.

# ‘द वाइव्हज’ मध्ये मौनी रॉयची एन्ट्री



मराठी इंस्टाग्रामवर मौनी रॉयने निर्माता-दिग्दर्शक मधुर भांडारकरसोबतचा तिचा खास फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये मौनी काळ्या बॉडीकॉन ड्रेसमध्ये तिच्या परफेक्ट फिगरला फ्लॉन्ट करताना दिसत आहे. या पोस्टसह मौनीने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, ‘या नवीन चित्रपटाच्या पहिल्या दिवसाबद्दल मी खरोखर उत्साहित आहे आणि स्वतः या उस्तादसोबत काम करण्यास मी आभारी आहे. ळालहरपवरीझरी पुढील प्रवासासाठी उत्साहित आहे द वाइव्हज.’ निर्माती-दिग्दर्शक एकता कपूरने मौनी आणि मधुरच्या या उत्तम सुरुवातीसाठी लाल हृदयाचा इमोजी बनवला आहे. त्याच वेळी, औरीने आगीचे इमोजींचा वर्षाव केला आहे. अभिनेता करण वीर मेहरा यांनी लिहिले, ‘शुभेच्छा’, दिशा पटानी यांनी लिहिले, ‘अभिनंदन माझ्या मौनी’, संदीप चॅटर्जी यांनी लिहिले, ‘अभिनंदन’, एका चाहत्याने लिहिले, ‘अभिनंदन मोना प्रिये’, दुसर्‍या चाहत्याने लिहिले, ‘मला तुझा खूप अभिमान आहे माझ्या बाळा’, दुसर्‍या चाहत्याने लिहिले, ‘तुझ्यासाठी खूप आनंद झाला.’ निर्माता-दिग्दर्शक मधुर भांडारकर ‘द वाइव्हज’ चित्रपटाद्वारे बॉलिवूड सेलिब्रिटींच्या पत्नींची कहाणी आणत आहेत. यात बॉलिवूडमधील सर्वात ग्लॅमरस महिलांमागे लपलेल्या आयुष्याशी संबंधित कथा दाखवल्या जातील. मौनी रॉय व्यतिरिक्त, सोनाली कुलकर्णी, रेजिना कॅसँड्रा, राहुल भट्ट, सौरभ सचदेवा, अर्जन बाजवा आणि फ्रेडी दारूवाला हे कलाकार ‘द वाइव्हज’ मध्ये महत्वाच्या भूमिकांमध्ये दिसतील.



# ’धडक २’चे नवीन पोस्टर रिलीज

जान्हवी कपूरने ’धडक’ सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते. तिच्यासोबत शाहिद कपूरचा भाऊ ईशान खट्टरनेही सिनेइंडस्ट्रीत प्रवेश केला. २०१८ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाच्या सुमारे ८ वर्षांनंतर आता त्याच्या सीक्वल ’धडक २’ ची चर्चा आहे. या चित्रपटात सिद्धांत चतुर्वेदी आणि तृप्ती डिमरी यात मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. त्यांचे चाहते या चित्रपटाची उत्सुकतेनं वाट पाहत आहेत. सध्या सिद्धांत आणि तृप्ती त्यांच्या आगामी चित्रपट ’धडक २’च्या तयारीत व्यग्र आहेत. बुधवारी करण जोहरने त्याच्या सोशल मीडिया इंस्टाग्राम हँडलवर या चित्रपटाचा एक रोमँटिक पोस्टर शेअर केला आहे. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. करण जोहरने ’धडक २’ चित्रपटाचे पोस्टर शेअर केले आणि लिहिले, ’करा. एक धडक.’ त्याने लिहिले की, ’धडक २’ लवकरच प्रदर्शित होणार आहे. या पोस्टरमध्ये सिद्धांत आणि तृप्ती एकमेकांना मिठी मारत रोमँटिक पोझ देताना दिसत आहेत. या पोस्टरवर लिहिले की, ’जर तुम्हाला मरणे आणि लढणे यापैकी एक निवडायचे असेल तर लढा.धडक २’ हा एक रोमँटिक ड्रामा चित्रपट आहे, ज्याची कथा शाजिया इक्बाल यांनी लिहिली आहे आणि तिने त्याचे दिग्दर्शनही केले आहे. हा चित्रपट करण जोहरच्या धर्मा प्रॉडक्शनने तयार केला आहे. असे म्हटले जात आहे की हा चित्रपट ’धडक’चा सीक्वल आहे, जो स्वतः सुपरहिट मराठी चित्रपट ’सैराट’चा रिमेक होता. ’धडक २’ हा चित्रपट १ ऑगस्ट २०२५

# चित्रपट संगीताचे विद्यापीठ

# अनिल विश्वास

'तुम्हारे बुलाने को जी चाहता है, जी चाहता है।

मुकद्दर बनाने को जी चाहता है।।'

प्रियकराच्या भेटीच्या आतुरतेने थकलेली मधुबाला बाहेर खिडकीतून बाहेर पाहताना जणू वृक्षावरील पक्ष्याला उद्देशून सांगते की, लवकर जा व तिच्या प्रियकराला घेऊन ये. १९४९ सालच्या 'लाडली' चित्रपटातील हे गीत अनिल विश्वास यांच्या संगीतात, लता मंगेशकरांच्या तत्कालीन कोवळ्या आवाजात नायिकेची हुरहूर अप्रतिम व्यक्त करते. १९४८ साली दिग्गज संगीतकार अनिल विश्वास यांना 'लता' नावाचा गाणहिरा गवसला. त्यांनी त्या हिऱ्याला पैलू पाडून त्याला कोहिनूरसारखे तेजस्वी केले. त्या तेजाच्या प्रकाशात त्यांच्याकडून १२० गाणे गाऊन घेत आपले संगीत साम्राज्य उजळून काढले. लतारूपी स्वररत्नात गुंफलेल्या रत्नहारातील काही गाण्यांचा उल्लेख करण्याचा मोह आवरत नाही.

१) 'एक दिलका लगाना बाकी था'- संथपणे हृदयातील हलचल, तेवढेच करायचे बाकी होते हे सुचविते. २) 'कहाँ तक हम उठाये गम। जिये अब या की मर जाये'- दुःख सहन करण्याची पण एक मर्यादा असते. ३) 'बेईमान तोरे नैनवा। निंदिया ना आये'- प्रियकराला जवळ घेऊन त्याला त्याच्या विरहातील अवस्था सांगते. ४) 'कटती है अब तो जिंदगी। मरने के इंतजार में'- प्रेमात विफलता आल्यानंतरच्या काळातील वैफल्यग्रस्त अवस्थेचे वर्णन. अनिलदांनी भारतीय चित्रपटात ऋतू संगीतावर आधारित 'हमदर्द' हा चित्रपट स्वतःच्या प्रॉडक्शनमध्ये काढला. १०० टक्के सांगीतिक चित्रपट. त्यात ख्याल, ठुमरी, दादरा, रवींद्र संगीत, कव्वाली व प्रादेशिक लोकगीतांचा वापर केला. 'ऋतू आये, ऋतू जाये सखीरे। मन के गीत न जाये.' गायक मन्ना डे व लता यांनी 'गौडसारंग' रागात आळवलेले हे गीत चित्रपटाची शान ठरले. 'बरखा ऋतू बैरी हमार' (गौडमल्हार), 'पी बिन सुना री' (जोगीया), 'आई मधु ऋतू बसंत बहार की' (बहार) हा तर मन्ना डे व लता यांनी स्वररसात घोळून गायलेला उत्कृष्ट नमुना! अनिलदांच्या प्रथम पत्नी आशालता विश्वास यांच्या सोबतीने १९४८ साली व्हेरायटी पिक्चर्स नावाची स्वतःची संस्था स्थापन केली. आशालता यांच्याशी १९५४ साली घटस्फोट झाल्यावर ही कंपनी बंद झाली. १९५७ साली अनिलदांनी सुरेल गायिका मीना कपूरशी विवाह केला. पहिल्या पत्नीपासून त्यांना तीन मुले व एक कन्या झाली.



'पूर्व बंगाल (आता बांगलादेश) मधील नदीमातृक प्रदेशातील बारीसाल येथे ७ जुलै १९१४ रोजी जोगेश व यमुनादेवी या दाम्पत्याच्या पोटी अनिल यांचा जन्म झाला. वयाच्या चौथ्या वर्षीच तबला व ढोल वाजवायला शिकले. थोडे मोठे झाल्यावर अश्विनीकुमार दत्त यांच्याकडून क्रांतीची दीक्षा घेऊन बालक्रांतिकारक बनले. वयाच्या १० व्या वर्षी बालगायक व बालसंगीतकारही बनले. श्रेष्ठ बासरी वादक पन्नालाल घोष त्यांचे मित्र होते. अनिलदांची बहीण पारुल हिचा विवाह घोष यांच्याशी झाला. पारुल घोष नंतर सिनेगायिका झाल्या. १९२९ साली कलकत्त्याला येऊन नाटके, नृत्य, गायन व अभिनय कलेत निष्णात झाले. १९३४ साली न्यू थिएटरचे संगीतकार हिरेन बोसने त्यांना मुंबईस आणले व १९३५ च्या 'धरम की देवी' चित्रपटाचे संगीतकार केले. त्यावेळी अनिलदा २१ वर्षांचे होते. 'कुछ भी नही भरोसा। दुनिया है आनी जानी।।' हे त्यांचे पहिले गायलेले व संगीत दिलेले चित्रपट गीत व हाच पहिला चित्रपट. १९३७ साली सागर मूव्हिटोनमध्ये सात व इतर कंपन्यांमध्ये तीन चित्रपट केले. नंतर नॅशनल स्टुडिओ कंपनीत मेहबूबखां यांचे दिग्दर्शन असलेल्या ११ चित्रपटात संगीत दिले. फिल्म उद्योगातही मुक्तीचे वारे वाहू लागले. करार करून राहण्याचे दिवस संपले. त्या काळात अनिलदा यांनी पहिला स्वतंत्र चित्रपट केला 'पहली नजर' (१९४६). 'आंसू न बहा फरीयाद न कर। दिल जलता है तो जलने दे।।' चित्रपटसृष्टीत १९४१ पासून असूनही बस्तान न बसल्यामुळे मुकेश अनिलदांकडे आले. कुठलेही संगीताचे रीतसर शिक्षण न घेतलेल्या मुकेश यांच्या आवाजातले मर्म ओळखून त्यांच्याकडून वरील अजरामर गाणे म्हणून घेतले. अनिलदा यांनी सुरय्या, पारुल घोष, अमीरबाई, राजकुमारी, अरुणकुमार, नसीम अख्तर, मीना कपूर, जोहराबाई, सुरेंद्र, मुकेश, तलत इ.चा आवाज वापरला. परंतु एका गोष्टीचा उलगडा होत नाही की, त्यांनी के. एल. सैगल, नूरजहाँ यांना आपल्या संगीतापासून लांबच ठेवले. मोहम्मद रफींकडून फक्त एक-दोनच गाणी गाऊन घेतली. अनिलदांना एक्सप्रेशन मेलेडी असेही म्हणायचे. 'सीनेमे सुलगते है अरमा' तसेच 'नैन मिले नैन हुये बावरे' हे दोन्ही तलत व लता यांनी गायलेली युगल गीते त्यांची अत्यंत आवडीची होती. त्यांनी जवळ जवळ ९० चित्रपटांना संगीत दिले व ७०० च्या वर गाणी दिलीत. माधुर्य संगीताचा प्रसार व सिनेसंगीतात ऑर्केस्ट्रायझेशनचा वापर हे त्यांचे योगदान. त्यांच्या मते सी. रामचंद्र, रोशन, मदनमोहन या शिष्याव्यतिरिक्त गुलाम हैदर, खेमचंद प्रकाश व सलील चौधरी हे उत्कृष्ट संगीतकार होते.

फिल्मी संगीत सोडल्यावर दिल्ली येथे डायरेक्टर ऑफ नॅशनल ऑर्केस्ट्रा, ए.आय.आर. या पदावर मार्च १९६३ ला रुजू झालेत. चिफ प्रोड्यूसर सुगम संगीत ऍट ए.आय.आर. म्हणून १९७५ पर्यंत राहिले. त्यानंतर त्यांनी दूरदर्शनसाठी म्युझिक तयार केले. सोप ऑपेरा, टी.व्ही. मालिका 'हमलोग' १९८४ साठी तसेच फिल्म डिव्हिजन अनेक डॉक्युमेन्टरिज १९९१ पर्यंत बनविल्यानंतर जवाहरलाल युनिव्हर्सिटीमध्ये प्रोफेसर रँकच्या मुख्य सल्लागार पदावर दोन वर्षे काम केले. त्यांना १९८६ साली संगीत नाटक अकॅडेमी पुरस्कार मिळाला. लता मंगेशकर पुरस्कार (म.प्र.) हा पुरस्कार मिळाला. ज्यांचे संगीत मानसिक आजारावर उपचार होते, ते महान आद्य संगीतकार अनिल विश्वास ३१ मे २००३ रोजी अनंताच्या प्रवासाला निघून गेलेत व समस्त चित्रपटसृष्टी पोरकी झाली. जिंदगी ख्वाब है....था हमे भी पता पर हमे जिंदगीसे बहुत प्यार था! हमसफर एक दिन तो बिछडनाही था! अलविदा, अलविदा, अलविदा!

**रमेश पोफळी**

# 'रामायण'साठी रणबीरने घेतले 'इतके' कोटी

लोकप्रिय अभिनेता रणबीर कपूरची मुख्य भूमिका असलेला 'रामायण' हा भारतातील सर्वाधिक महागडा चित्रपट असल्याचं म्हटलं जात आहे. यामध्ये रणबीर कपूरसह अभिनेता यश आणि साई पल्लवी हे कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकेतून झळकणार आहेत. या चित्रपटाचे दोन भाग प्रदर्शित होणार आहेत. याचा पहिला भाग २०२६ मध्ये दिवाळीदरम्यान प्रदर्शित होणार आहे. निमित मल्होत्रा यांची निर्मिती असलेल्या 'रामायण' चित्रपटाचं एकूण बजेट वृत्तानुसार १६०० कोटी इतकं आहे.

चित्रपटाच्या पहिल्या भागात निर्मात्याने ९०० कोटींची गुंतवणूक केली आहे तर दुसऱ्या भागासाठी ७०० कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. 'रामायण' चित्रपटात कलाकारांची मोठी फौज पाहायला मिळणार आहे, त्यामुळे या कलाकार मंडळींनी चित्रपटातील त्यांच्या भूमिकांसाठी किती रुपयांचं मानधन घेतलं आहे जाणून घेऊ...

'रामायण'मध्ये रामाची भूमिका साकारणारा अभिनेता रणबीर कपूर एकूण १५० कोटी रुपये इतकं मानधन घेणार असल्याचं म्हटलं जात आहे. ज्याची विभागणी पहिल्या भागासाठी ७५ कोटी तर दुसऱ्या भागासाठीसुद्धा ७५ कोटी रुपये अशा दोन टप्प्यात होणार आहे. रणबीरसह या चित्रपटात अभिनेत्री साई पल्लवी महत्त्वाच्या भूमिकेतून झळकणार आहे. ती यामध्ये सीतेची भूमिका साकारणार असून यासाठी ती पहिल्या आणि दुसऱ्या भागासाठी ६-६ कोटी असं एकूण १२ कोटी इतकं मानधन घेणार असल्याचं म्हटलं जात आहे.

रणबीर कपूर, साई पल्लवी यांच्यासह चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिका साकारणारा दाक्षिणात्य अभिनेता यश 'रामायण'मधील त्याच्या भूमिकेसाठी पहिल्या भागासाठी ५० कोटी तर दुसऱ्या भागासाठीसुद्धा ५० कोटी असं एकूण १०० कोटींचं मानधन घेणार असल्याचं म्हटलं जात आहे; तर काही माध्यमांच्या वृत्तानुसार यश रणबीर कपूरपेक्षाही जास्त २०० कोटी रुपयांचं मानधन घेणार असल्याचं म्हटलं जात आहे. 'रामायण' चित्रपटात रणबीर कपूर, यश, साई पल्लवी यांच्यासह अभिनेते अरुण गोविल, सनी देओल, रवी दुबे, आदिनाथ कोठारी, काजल अग्रवाल, रकुल प्रीत सिंह यांसारखे इतर काही कलाकार झळकणार आहेत. नुकताच ३ जुलै रोजी चित्रपटाचा टिझर प्रदर्शित करण्यात आला आहे. यानंतर सोशल मीडियासह सर्वत्र या चित्रपटाबद्दल मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाली.



# हॉरर कॉमेडी युनिव्हर्समध्ये मानुषी



मॅडॉक फिल्म्सच्या हॉरर कॉमेडीचे जग आणखी विस्तृत होत चालले आहे. स्त्री, भेडिया यासारखे चित्रपट निर्माण करणारे प्रॉडक्शन हाउस आता नवा प्रवास सुरू करणार आहे. मॅडॉक फिल्म्सच्या पुढील चित्रपटासाठी दोन नवे चेहरे आणले जाणार आहेत. सुपरस्टार रणवीर सिंह आणि मानुषी छिल्लर या चित्रपटात दिसून येणार आहेत. रणवीर काही काळापासून दिनेश विजानसोबत चर्चा करत आहे. रणवीरने मागील आठवड्यात मॅडॉकच्या कार्यालयात हजेरी लावली होती. रणवीर हॉरर कॉमेडी शैलीच्या चित्रपटात काम करण्यासाठी उत्सुक असून लवकरच यासंबंधी कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण होणार आहे. रणवीर सध्या आदित्य धरच्या 'धुरंधर'चे चित्रिकरण करत आहे. तसेच तो डॉन ३ चित्रपटात काम करणार आहे. धुरंधरचा टीझर लवकरच प्रदर्शित केला जाणार आहे. तर मानुषी ही लवकरच मालिक या चित्रपटात राजकुमार रावसोबत दिसून येणार आहे. मॅडॉकने यापूर्वी आयुष्मान खुरानाची मुख्य भूमिका असलेला चित्रपट 'थामा'ची घोषणा केली होती. या चित्रपटात त्याच्यासोबत नवाजुद्दीन सिद्दीकी आणि रश्मिका मंदाना दिसून येणार आहे. तर मॅडॉकच्या 'शक्ति शालिनी' चित्रपटात कियारा मुख्य भूमिकेत असणार आहे.

# साई पल्लवी करणार बॉलिवूडमध्ये पदार्पण



साई पल्लवी सध्या दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या 'रामायण' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. साई रामायणात माता सीतेच्या भूमिकेत दिसणार आहे. पण या चित्रपटापूर्वी साई 'एक दिन' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. त्याची रिलीज डेट देखील जाहीर झाली आहे. तिची सहकलाकार कोण आहे ते जाणून घेऊया...

माध्यमातील वृत्तानुसार, साई पल्लवी तिच्या पहिल्या बॉलिवूड रोमँटिक ड्रामा चित्रपट 'एक दिन' द्वारे हिंदी चित्रपटांमध्ये पदार्पण करणार आहे. या चित्रपटात आमिर खानचा मुलगा जुनैद खान तिच्यासोबत दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन सुनील पांडे करणार आहेत. हा चित्रपट आमिर खान प्रॉडक्शन अंतर्गत तयार केला जात आहे. या चित्रपटाचे सह- निर्माते मन्सूर खान आहेत. अखेर, साई पल्लवी आणि जुनैद खान यांचा पहिला एकत्रित चित्रपट 'एक दिन' प्रदर्शित झाला आहे. हा रोमँटिक ड्रामा चित्रपट ७ नोव्हेंबर २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होईल. साई पल्लवीसोबतचा जुनैदचा हा पहिलाच चित्रपट आहे. 'एक दिन' व्यतिरिक्त, साई पल्लवी दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या 'रामायण' चित्रपटात माता सीतेच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटात रणबीर कपूर, यश आणि सनी देओल मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. रामायणाचा पहिला भाग २०२६ च्या दिवाळीला प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात यश-रावण, सनी देओल-हनुमान, रवी दुबे-लक्ष्मण, साई पल्लवी-माता सीता आणि रणबीर कपूर भगवान रामाच्या भूमिकेत दिसणार आहेत. अलीकडेच चित्रपटातील रणबीर कपूरचा लूक शेअर करण्यात आला, जो पाहिल्यानंतर चाहत्यांच्या चित्रपटाबद्दलच्या अपेक्षा आणखी वाढल्या आहेत.



# 'मुंबई लोकल'मध्ये झळकणार ज्ञानदा

स्टार अभिनेता प्रथमेश परब आणि अभिनेत्री ज्ञानदा रामतीर्थकर लवकरच 'मुंबई लोक' या नव्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. या चित्रपटाचे पोस्टर सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. ७ ऑगस्ट रोजी हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. ज्ञानदाने इन्स्टाग्रामवर पोस्ट करत या चित्रपटाबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. '७.१८ ला हरवायचंय आशिष सोबत उरायचं फक्त आठवणींचं स्टेशन! मुंबई लोक-प्रेमाचं टाइमटेबल' असे तिने स्वतःच्या पोस्टमध्ये म्हटले आहे. या चित्रपटातून एक हळुवार प्रेमकथा प्रेक्षकांना पहायला मिळणार आहे. बिग ब्रेन प्रॉडक्शन्स आणि आनंदी एंटरटेन्मेंट प्रस्तुत 'मुंबई लोकल' या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन अभिजीत यांनी केले आहे. बिग ब्रेन प्रॉडक्शनचे निलेश राठी आणि आनंदी एंटरटेन्मेंटचे प्राची राऊत, सचिन अगरवाल हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. या चित्रपटात प्रथमेश आणि ज्ञानदा ही जोडी पहिल्यांदाच एकत्र आली आहे. मनमीत पेम, पृथ्वीक प्रताप, वनिता खरात, अभिजीत चव्हाण, अनिकेत केळकर, संजय खापरे, संजय कुलकर्णी, स्मिता डोंगरे हे कलाकारही यात दिसून येतील. मुंबई लोकल या चित्रपटात मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या लोकल रेल्वेमध्ये घडणारी एक मनोरंजक प्रेम कहाणी मांडण्यात आली आहे. ज्ञानदाच्या अनेक मालिका गाजल्या आहेत. याचबरोबर धुरळा या चित्रपटातही तिने काम केले आहे.